Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-II Feb. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

उच्च शिक्षणातील कमवा आणि शिका–एक श्रमसंस्कार योजना

श्री. अंकुश रा. बनसोडे
सहाय्यक प्राध्यापक,
बी. ए. बी. एड्. विभाग,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.
ई मेल: abansode1234@gmail.com

सारांश

घरची परिस्थिती बेताची असतानाही केवळ शिकण्याची जिद्द, कष्ट घेण्याची तयारी यातून आपल्या क्षमतांचे क्षितीज विस्तारू पाहणा–या तरूण मुलांमुलींसाठी 'कमवा आणि शिका' ही योजना उपलब्ध आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रथमत: 'कमवा आणि शिका' चा मूलमंत्र दिला. यातून ग्रामीण भागात, तळागाळात, वाडया–वस्त्यांवर मुलामुलींसाठी मदतीचा हात म्हणून कार्यरत आहे.

उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कारही रूजावा या हेतूने 'कमवा आणि शिका' योजनेतून श्रमालाही प्रतिष्ठा मिळते आहे. महाराष्ट्राच्या कानाकोप–यातला तरूण आयुष्यात काहीतरी करून दाखवण्याच्या जिद्दीने धडपडतो. या धडपडीला या योजनेमुळे मूर्त स्वरूप मिळतं आहे. महाविद्यालयामध्ये उच्च शिक्षण घेत असताना कमवून आपला शिक्षण खर्च भागवावा असं ज्यांना वाटतं, ते या योजनेत काम शोधतात.

बिज शब्द : उच्च शिक्षण, कमवा आणि शिका–एक श्रमसंस्कार योजना

प्रस्तावना

परिस्थिती शिक्षणात कधीच अडथळा ठरू शकत नाही. प्रामाणिक प्रयत्न, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आपण परिस्थितीवर विजय मिळवायलाच हवा. ध्येय गाठण्याच्या आपल्या वाटेवर अनेक चांगली माणसं भेटतात. मदतीसाठी पुढे सरसावतात. आपण प्रयत्न केले तर मदत मिळतेच, स्वत:वर विश्वास असे तर जगातील कोणतीच गोष्ट आपल्याला ध्येयापासून दूर ठेवू शकत नाही.

घरची परिस्थिती बेताची असतानाही केवळ शिकण्याची जिद्द, कष्ट घेण्याची तयारी यातून आपल्या क्षमतांचे क्षितीज विस्तारू पाहणा–या तरूण मुलांसाठी 'कमवा आणि शिका' ही योजना उपलब्ध आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रथमत: 'कमवा आणि शिका' चा मूलमंत्र दिला. यातून ग्रामीण भागात, तळागाळात, वाडया–वस्त्यांवर मुलामुलींसाठी मदतीचा हात म्हणून कार्यरत आहे.

उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कारही रूजावा या हेतूने 'कमवा आणि शिका' योजनेतून श्रमालाही प्रतिष्ठा मिळते आहे. महाराष्ट्राच्या कानाकोप–यातला तरूण आयुष्यात काहीतरी करून दाखवण्याच्या जिद्दीने धडपडतो. या धडपडीला या योजनेमुळे मूर्त स्वरूप मिळतं आहे. महाविद्यालयामध्ये उच्च शिक्षण घेत असताना कमवून आपला शिक्षण खर्च भागवावा असं ज्यांना वाटतं, ते या योजनेत काम शोधतात.

ही योजना राज्यात सर्वात प्रभावीपणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राबविण्यात येत आहे. विद्यापीठ व विद्यापीठाअंतर्गत येणा–या पुणे, नगर, नाशिक येथील संलग्न ४०० महाविद्यालयात ही योजना कार्यान्वित आहे. विद्यापीठातून ७५० विद्यार्थी याचा लाभ घेतात. ४५० महाविद्यालयातून तब्बल १५ हजार विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. या योजनेचा लाभ घेऊन शिकलेली अनेक मुलं आज उच्चपदस्थ आहेत.

याच पध्दतीने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथीलही कार्य चालते आहे. शिवाजी विद्यापीठात या योजनेतील विद्यार्थ्यांसाठी विशेष मोफत वसतीगृह स्थापन केले आहे.

योजनेचा लाभ कोण घेऊ शकतं?

- ज्या विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न पाच लाख रूपयांपर्यंत आहे, ते या योजनेत सहभागी होऊ शकतात.
- यापेक्षा कमी उत्पन्न असणा–या विद्यार्थ्यांच्या पालकांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला सादर करावा लागतो.
- या योजनेत कमीत कमी ३० टक्के सहभाग मुलींचा असणं अनिवार्य आहे.
- विकलांग विद्यार्थी, मुली यांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ देण्याचा प्रयत्न केला जातो.
- पदवी अथवा पदव्युत्तर वर्गात शिक्षण घेणारे विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

कमवा व शिका योजनेअंतर्गत कुठली कामं केली जातात?

- सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने आणि विविध कौशल्ये अवगत होण्याकरता तरूण मुलांना विविध कामं सांगितली जातात.
- नर्सरीच्या माध्यमातून रोपं तयार करणं व बागकाम.
- विद्यापीठास किंवा महाविद्यालयास आवश्यक स्टेशनरी साहित्य तयार करणं. उदा. पॅड, फाईल, वहया, पाकिटं इ.
- टेलिफोन कॉल सुविधेमध्ये वसतिगृह प्रशासनाला मदत करणे.
- ज्या विद्यार्थ्यांना प्लंबिग, इलेक्ट्रिकल, सुतारकाम अशी कामं येत असल्यास किंवा या कामाची माहिती आणि आवड असल्यास ही कामं करण्याची संधी.
- विद्यापीठात किंवा महाविद्यालयात शैक्षणिक प्रयोगशाळेत सहायक म्हणून काम करणे. तेथील उपकरणे हाताळण्याचं प्रशिक्षण घेऊन ती कामं करणे.
- टायपिंगची तसेच मुद्रणालयातील कामे.
- विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील विभागप्रमुख व प्राध्यापकांना संशोधनासाठी सहायक म्हणून मदत करणे.
- महाविद्यालय, संस्थेच्या ग्रंथालयात मदतनिस म्हणून काम करणे.

- विविध विभागांत संगणकावर आधारित कामं करणे.
- विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील विभागप्रमुख व प्राध्यापकांना संशोधनासाठी सहायक म्हणून मदत करणे.
- महाविद्यालय, संस्थेच्या ग्रंथालयात मदतनिस म्हणून काम करणे.
- विविध विभागांत संगणकावर आधारित कामं करणे.
- ग्रंथालयातील मदतनिस
- झेरॉक्स मशिन चालवणे.
- विद्यापीठाच्या अल्पोपहार गृहातील काम.
- मेस क्लब चालवणे.
- विद्यापीठ संगणक नेट विभाग मदनीस
- विद्यापीठ व महाविद्यालयात कन्झूमर स्टोअर्स चालवणे.

कामाचे तास किती?

- विद्यार्थ्याला प्रत्येक दिवशी जास्तीत जास्त चार तास कार्यालयीन काम देता येते.
- विद्यार्थ्याला प्रत्येक दिवसाला जास्तीत जास्त तीन तास फील्ड वर्क करता येते. कार्यालयाला सुट्टी असेल त्या दिवशीही फील्ड वर्क करता येते.
- महिन्याला जास्तीत जास्त ९० तास इतंक काम देण्यात येते.
- १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे या दिवशी विद्यार्थ्यांना कामं दिली जात नाहीत.

पैसे किती मिळतात?

'कमवा आणि शिका' योजनेत काम करणा–याला केलेल्या कामाचा मोबदला म्हणून ताशी ३० रूपये मानधन दिले जाते. मात्र या पैशासह मुलांना मिळणारा प्रत्यक्ष कामाचा अनुभव, आत्मविश्वास आणि स्वयंनिर्भर असण्याची जाणीव हे सारं शिक्षण घेऊन पुढे जाण्याच्या वाटेवर बळ देणारं ठरते.

सारांश

घरची परिस्थिती बेताची असतानाही केवळ शिकण्याची जिद्द, कष्ट घेण्याची तयारी यातून आपल्या क्षमतांचे क्षितीज विस्तारू पाहणा–या तरूण मुलांसाठी 'कमवा आणि शिका' ही योजना उपलब्ध आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रथमत: 'कमवा आणि शिका' चा मूलमंत्र दिला. यातून ग्रामीण भागात, तळागाळात, वाडया–वस्त्यांवर मुलामुलींसाठी मदतीचा हात म्हणून कार्यरत आहे.

उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कारही रूजावा या हेतूने 'कमवा आणि शिका' योजनेतून श्रमालाही प्रतिष्ठा मिळते आहे. महाराष्ट्राच्या कानाकोप–यातला तरूण आयुष्यात काहीतरी करून दाखवण्याच्या जिद्दीने धडपडतो. या धडपडीला या योजनेमुळे मूर्त स्वरूप मिळतं आहे. महाविद्यालयामध्ये उच्च शिक्षण घेत असताना कमवून आपला शिक्षण खर्च भागवावा असं ज्यांना वाटतं, ते या योजनेत काम शोधतात.